# MAHILA AROGYA SASHAKTIKARAN
# & SANVARDHAN
# (MASS)

## MEMORANDUM OF UNDERSTANDING

*In associations with*

* Health Department,
Zilla Parishad, Aurangabad *

*with*

* Mahatma Gandhi Mission,
Medical college and Hospital, Aurangabad *

*with*

* GeBBS Foundation, India *

# महिला आरोग्य सशक्तीकरण आणि संवर्धन

**"Mahila Arogya Sashaktikaran & Sanvardhan" (MASS)**

**महिला आरोग्य संवर्धन कार्यक्रम राबविण्यासाठी खालीलप्रमाणे समिती स्थापन गठीत करण्याचे अनुषंगाने प्रस्ताव :**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | मा.मुख्य कार्यकारी अधिकारी | - | समिती अध्यक्ष |
| २. | एम.जी.एम. संस्था प्रतिनिधी | - | समिती सदस्य |
| ३. | G.E.B.B.S. Foundation, India प्रतिनिधी | - | समिती सदस्य |
| ४. | नोडल अधिकारी (एम.जी.एम.) (MAS) | - | समिती सदस्य |
| ५. | नोडल अधिकारी,(साथरोग वैद्यकिय अधिकारी,आरोग्य विभाग,जि.प.) | - | समिती सदस्य |
| ६. | जिल्हा आरोग्य अधिकारी | - | समिती सदस्य सचिव |

**महिला आरोग्य संवर्धन कार्यक्रमात अंतर्भुत बाबी :**

- आशा स्वयंसेविकांद्वारे घरोघरी जावून महिलांचे सर्वेक्षण करणे - मानधन
- सर्वेक्षीत महिलांची आरोग्य तपासणी करीता शिबीरांचे आयोजन
- आरोग्य तपासणी अंतर्गत महिलांच्या रोगनिदान चाचण्या
- पुढील उपचार(संदर्भ सेवा),तपासणी, पुनर्भेट तपासणीसाठी आरोग्य तपासणी कार्डचे वाटप
- संदर्भसेवेकरीता वाहन व्यवस्था
- मोफत तपासणी व औषधोपचार
- अहवाल संकलन,पृथक्करण व सादरीकरण (एम.जी.एम.,गीब्स,आरोग्य विभाग,जि.प.)
- आंतररुग्णांची निवास व भोजन व्यवस्था.

**महिला आरोग्य संवर्धन कार्यप्रणाली :**

1. **आशा गृहभेट :** आशा स्वयंसेविकांमार्फत गृहभेटीद्वारे महिलाच्या आजाराची माहिती संकलन
2. **गटप्रवर्तक :** आशा स्वयंसेविकांमार्फत प्राप्त अहवालांचे संकलन व वैद्यकिय अधिकारी यांना सादरीकरण
3. **वैद्यकिय अधिकारी :** आशा स्वयंसेविकांमार्फत प्राप्त अहवालांची पडताळणी करुन जिल्हा नोडल अधिकारी (जि.प.) यांचेकडे विस्तृत अहवाल सादरीकरण
4. **नोडल अधिकारी (जि.प) :** वैद्यकिय अधिकारी यांचेमार्फत प्राप्त अहवालाविषयी नोडल अधिकारी (एम.जी.एम.)यांचेशी प्रत्यक्ष चर्चा करुन शिबिराचे ठिकाण,तारीख व वेळ ठरवतील.
5. **शिबिराचे आयोजन :** शिबिराचे आयोजन करुन महिलांची तपासणी, रोगनिदान व संदर्भ सेवा
6. एम.जी.एम. नोडल अधिकारी (MAS) हे गीब्स संस्था व आरोग्य विभाग, जि.प.औरंगाबाद यांना बैठकीदरम्यान झालेल्या कामाचा अहवाल,सुचना,सुधारण याबात अवगत करतील.

भारत 2023 INDIA

# आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद

सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

जा.क्र./जिपऔ/आरोग्य/कावि/ /२०२३
कार्यालय:-आरोग्य विभाग, जिल्हा परिषद,औरंगाबाद
दिनांक :-०९/05/2023

## सामंजस्य करार

विषय :- **औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागांमध्ये महिलांसाठी मोफत रोग निदान व उपचार कार्यक्रम दि. 10 मे 2023 ते 31 मार्च 2027 पर्यंत राबविणे**

संदर्भ:- दिनांक 9 मे 2023 रोजी **GeBBS Foundation, India** यांनी दिलेले पत्र

उपरोक्त नमूद विषयात अन्वये औरंगाबाद जिल्ह्यातील ग्रामीण भागातील महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी व रोग निदान कार्यक्रम दि. 10 मे 2023 ते 31 मार्च 2027 पर्यंत राबविण्यासाठी आरोग्य विभाग जिल्हा परिषद औरंगाबाद व महात्मा गांधी मिशन मेडिकल कॉलेज औरंगाबाद तसेच **GeBBS Foundation, India** यांच्या संयुक्त विद्यमाने सदर कार्यक्रमावर होण्यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांच्या वतीने परवानगी देण्यात येत आहे.

या उपक्रमाद्वारे ग्रामीण, दुर्गम, डोंगरी व दळणवळणाची साधने नसणाऱ्या गाव, उपकेंद्र किंवा प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी महिलांची सर्वांगीण आरोग्य तपासणी व्हावी ज्यामध्ये VIA screening, Pap Smear, Colposcopy, Clinical Breast Examination, Oral cancer Examination तसेच इतर गंभीर आजारांची लक्षणे शोधून वेळीच रोगनिदान व उपचार व्हावे या हेतूने महिला आरोग्य सशक्तिकरण व संवर्धन **Mahila Aarogya Sashaktikaran & Sanvardhan (MASS)** कार्यक्रम राबविण्याचे ठरले आहे.

या नावीन्यपूर्ण उपक्रमामध्ये रोग निदान झालेल्या महिला रुग्णांना मोफत उपचाराची सुविधा एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद येथे **GeBBS Foundation, India** च्या मदतीने करण्यात येईल. हा समाजाभिमुख उपक्रम आरोग्य विभाग, जिल्हा परिषद, औरंगाबाद, एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय, औरंगाबाद आणि **GeBBS Foundation, India** याच्या संयुक्त सहभागाने राबविण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा परिषद आरोग्य विभाग यांच्यावर कोणत्याही स्वरूपाचा आर्थिक बोजा पडणार नाही.

करिता वरील प्रमाणे सामंजस्य करार करण्यात येत आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| **अध्यक्ष** | **अधिष्ठाता** | **जिल्हा आरोग्य अधिकारी** | **मुख्य कार्यकारी अधिकारी** |
| GeBBS Foundation, India | एमजीएम, वैद्यकीय महाविद्यालय औरंगाबाद | जिल्हा परिषद, औरंगाबाद | जिल्हा परिषद, औरंगाबाद |